

जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक । वर्ष १ । अंक ५२ । गुरुवार, २८ ऑगस्ट २०२५ | मूल्य : २ रु. | पाने : ४

RNI NO - MAHMAR/2022/84210







## संक्षिप्त

### विशेष मेट्रो सेवा व प्रवासाचे नियोजन

**पुणे, ता. २७ :** कसबा, मंडई आणि स्वारगेट ही मुख्य मेट्रो स्थानके गणपती मंडळांच्या अगदी जवळ असल्याने प्रवाशांना थेट दर्शनासाठी पोहोचता येणार आहे. महामेट्रोने दिलेल्या माहितीनुसार, गर्दीचे नियोजन करण्यासाठी प्रवाशांनी कसबा पेठ मेट्रो स्थानकावर उतरून दर्शनासाठी पुढे जावे आणि परतीचा प्रवास मंडई मेट्रो स्थानकावरून करावा. यामुळे एकाच स्थानकावर होणारी गर्दी टाळता येईल. वनाझ ते रामवाडी मार्गावरून येणाऱ्या प्रवाशांनी पुणे महापालिका मेट्रो स्थानकावर उतरून दर्शनासाठी जावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

**रात्री २ पर्यंत सेवा सुरू**

पुण्यात रात्री उशिरापर्यंत गणपती देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची सोय व्हावी यासाठी महामेट्रोने मेट्रो सेवा रात्री २ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. एका मेट्रो ट्रेनमधून एका वेळी किमान ९०० प्रवासी प्रवास करू शकतात, त्यामुळे दर ३ मिनिटांनी सेवा उपलब्ध झाल्यावर मोठ्या संख्येने प्रवाशांची वाहतूक करणे शक्य होईल. यावर्षी या खास उपाययोजनेमुळे पुण्यातील गणेशोत्सव अधिक सोपा, जलद व सुरक्षित होईल, असा विश्वास महामेट्रोने व्यक्त केला आहे.

### डोर्लेवाडीत पारंपारिक पद्धतीने बाप्पाचे स्वागत

**डोर्लेवाडी :** डोर्लेवाडी परिसरात यंदाही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपारिक पद्धतीने साजरा होत आहे. गावातील गणेश मंडळे, युवक संघटना तसेच प्रत्येक कुटुंबाने गणरायाचे स्वागत गजरात व ढोल-ताशांच्या निनादात केले. सकाळपासूनच गावात मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. गावातील प्रमुख चौकांवर आकर्षक सजावट करण्यात आली असून, विविध मंडळांकडून सांस्कृतिक कार्यक्रम, नाटिका आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महिला वर्गाने पारंपारिक पोशाखात व पारंपारिक वाद्यांच्या तालावर वाजतगाजत बाप्पाचे स्वागत केले. गणपती आगमनावेळी ढोल, ताशा, टाळ-झांज यांच्या गजरात परिसर दुमदुमून गेला.

# पूर्व हवेलीत लाडक्या बाप्पाचे मोठ्या धुमधडाक्यात स्वागत

## पारंपारिक व धार्मिक पद्धतीने गणपतीची प्राणप्रतिष्ठापना

**विशाल कदम**





**लोणी काळभोर, ता.२७ :** पावसाची रिमझिम अंगावर झेलत पूर्व हवेलीकरांनी आपल्या लाडक्या बाप्पाला आज मोठ्या उत्साहात स्वागत करीत घरी आणले. 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया', 'एक...दोन.. तीन.. चार...गणपतीचा जयजयकार', 'मोरया रे, बाप्पा मोरया रे..' अशा अनेक घोषणांनी वातावरण भारुन टाकत, गणेशभक्तांच्या अभूतपूर्व उत्साहात विघ्नहर्ता मानल्या जाणाऱ्या गणपती बाप्पांची कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, कुंजीरवाडी, सोरतापवाडी, उरुळी कांचनसह परिसरातील अनेक ठिकाणी लहान मोठ्या मंडळांसह घरगुती गणपतीची प्रतिष्ठापना बुधवारी (ता. २७) भक्तीभावाने करण्यात आली आहे.

लोणी काळभोर व उरुळी कांचन बाजारपेठेतील रस्ते बाप्पांच्या प्रतिष्ठापनेसाठी रविवार सकाळपासूनच गर्दीने फुलले होते. पूजा साहित्य, मखर, सजावटीचे साहित्य खरेदीसाठी भाविकांची मोठी गर्दी होती. गणेश मंडळांनी आपापल्या सजविलेल्या वाहनांतून ढोल-ताशे, गुलाल, फुलांच्या उधळणीसह वाजत - गाजत मोठ्या जल्लोषात श्री गणेशाची मूर्ती नेली. आकर्षक रंगसंगीत व विविध आकारातील मूर्ती विक्रीस होत्या. अनेक ठिकाणी नागरिकांनी शाडू मातीपासून बनविलेल्या मूर्ती खरेदीवर भर दिला. सार्वजनिक मंडळांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे.

घरोघरी व लहान मोठ्या मंडळांमध्ये धुमधडाक्यात बाप्पांचं स्वागत करण्यात आले आहे. यावेळी भाविकांनी सकाळपासूनच केळीचे खोड, दुर्वा, श्री गणेश मूर्ती, पुजा, नारळ, गुलाल, साखरमिश्रीत खोबरे, मूर्तीसाठी विविध प्रकारचे हार, माळा, तोरण, श्री गणेशाच्या स्वागताच्या लहान कमानी, महिरपी लहान आसने खरेदीसाठी गर्दी केली होती. सोबत मोदक, पेढे यांनाही आज प्रचंड मागणी होती.आजपासून हा सोहळा अनेक ठिकाणी तब्बल १० दिवस चालणार असून उत्तरोउत्तर तो रंगत जाणार आहे.

अनेक मंडळांमध्ये बाप्पा विराजमान...

लोणी काळभोर गावातील श्रीमंत अंबरनाथ मित्र मंडळ, क्रांतिवीर व समता समाज मित्र मंडळ, महात्मा गांधी प्रतिष्ठान, जय महाराष्ट्र व जय बजरंग मित्र मंडळ, तिरंगा व गणराज मित्र मंडळ, आदर्श तरुण मंडळ, अखिल रायवाडी मित्र मंडळ, महात्मा फुले व त्रिमूर्ती मित्र मंडळ आदी मंडळांनी उत्साहात गणपती बाप्पांचे स्वागत केले. कदमवाकवस्ती गावाच्या हद्दीतील लोणी स्टेशन येथील श्रीगणेश मित्र मंडळ, मूनलाईट मित्र मंडळ व धर्मवीर संभाजी महाराज मित्र मंडळाच्या वतीने गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. संभाजीनगर येथील अष्टविनायक मित्र मंडळ, कदमवस्ती येथील सम्राटमित्र मंडळ, वाकवस्ती येथील छत्रपती शिवाजी महाराज तरुण मित्र मंडळ, कवडीपाट येथील श्री विनायक प्रतिष्ठान मित्र मंडळाने गणेश मूर्तींची प्रतिष्ठापणा केली.

दरम्यान, उरुळी कांचनमधील आश्रम रोड परिसरातील महात्मा गांधी तरुण मंडळ, जय महाराष्ट्र तरुण मंडळ, शिवछत्रपती मित्र मंडळ, गुरुदत्त मित्र मंडळ, बाजार मैदान येथील अनुपम मित्र मंडळ, भोलेनाथ तरुण मंडळ, गूळ आळी येथील श्रीमंत वीर तरुण मंडळ, तुपे वस्ती येथील नवजीवन मित्र मंडळ, महात्मा गांधी रास्ता परिसरातील श्रीकृष्ण मित्र मंडळ, साईनाथ तरुण मंडळ, पोलिस चौकी परिसरातील नवचैतन्य मित्र मंडळ, तळवाडी चौक परिसरातील अखिल तळवाडी मित्र मंडळ, शिंदवणे रोड येथील नव आझाद तरुण मंडळ या महत्त्वाच्या मंडळांप्रमाणेच परिसरातील सर्व गणेश मंडळे व घरगुती गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली. शिंदवणे येथील शिवछत्रपती तरुण मंडळ, सोरतापवाडी येथील सुदर्शन युवा मित्र मंडळ, अखिल सोरतापवाडी सार्वजनिक गणेश गावठाण, गणेशनगर मित्र मंडळ, चिंतामणी मित्र मंडळ, एकता तरुण मंडळ, शिवतेज मित्र मंडळाने गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली.

### सोशल मीडियाही झाला 'बाप्पामय'..

मित्रपरिवार, नातेवाईक यांना भेटणे शक्य नसल्याने व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्राम, मेसेंजर यासारख्या सोशल मीडियाच्या माध्यमातून एकमेकांना शुभेच्छा दिल्या जात आहेत. नेटकऱ्यांकडून श्री गणेशाचे फोटो एकमेकांना फॉरवर्ड केले जात आहेत. वेगवेगळे व्हिडिओ, स्टिकर्स, आरती संग्रह यामुळे सोशल मीडिया बाप्पामय झाला असून, नेटकरी कित्येक दिवस अगोदरपासून बाप्पांचे मेसेज व फोटो फॉरवर्ड करत आहेत. वेगवेगळे व्हिडिओज, आरती संग्रह याद्वारे सोशल मीडिया बाप्पामय झाला आहे.

# प्रभागांत माजी नगरसेवक-इच्छुकांचा सुळसुळाट

## निवडणुकीच्या तोंडावर पुणेकरांचा वाढत्या गर्दीवर रोष

**पुणे, ता. २७ :** पुणे महानगरपालिकेच्या निवडणुका जवळ आल्याने माजी नगरसेवक आणि इच्छुक उमेदवारांनी प्रभागांमध्ये भेटीगाठी सुरू केल्या आहेत. नगरसेवकांनी संपूर्ण प्रभागात समान कामे करण्याऐवजी आपापल्या सोयीनुसार कामांची वाटणी केली. त्यामुळे काही भागांमध्ये विकास झाला, तर काही भाग दुर्लक्षित राहिले. जेव्हा नागरिक आपल्या समस्या घेऊन गेले, तेव्हा त्यांना ''तो माझा भाग नाही, त्या नगरसेवकाकडे जा'' असे उत्तर मिळाले. आता नवीन प्रभाग रचनेमुळे क्षेत्र रचना बदलली आहे. यामुळे, जेव्हा हेच माजी नगरसेवक मतदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करतात आहेत, तेव्हा त्यांना मतदारांच्या थेट प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. आता मतदार उमेदवारांना 'इतके दिवस कुठे होता?' असा थेट सवाल विचारून आपला रोष व्यक्त करत आहेत.

**प्रशासकीय कारभारामुळे वाढलेली गैरसोय**

२०२२ मध्ये होणारी महापालिका निवडणूक ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यामुळे तीन वर्षे लांबणीवर पडली. या काळात महापालिकेवर प्रशासक कार्यरत होते, ज्यामुळे लहान-सहान कामांसाठीही प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. त्यावेळी माजी नगरसेवकांनीही हात वर केले. निवडणुका जाहीर होताच हेच माजी नगरसेवक पुन्हा मतदारांना भेटण्यासाठी सक्रिय झाले आहेत. पण, मतदारांचा थेट रोष पाहून अनेक इच्छुकांना संकोच वाटत आहे. त्यामुळे, काही इच्छुक उमेदवारांनी आपली व्यथा बोलून दाखवली असून, आता ते प्रभागांच्या हद्दी तपासण्यासाठी आणि नागरिकांना भेटण्यासाठी बाहेर पडत आहे. ही परिस्थिती पाहता, यंदाची निवडणूक या इच्छुकांसाठी सोपी नसून, मतदारांच्या नाराजीमुळे त्यांना मोठा संघर्ष करावा लागू शकतो.






# उरुळी कांचन येथे स्वतंत्र अग्निशमन केंद्रास मंजूरी

## पीएमआरडीए कडून ११ कोटींचा निधी, यशवंतचे संचालक संतोष कांचन यांची माहिती

**हनुमंत चिकणे**



उरुळी कांचन, ता. २७ : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) ने उरुळी कांचन (ता. हवेली) येथे स्वतंत्र अग्निशमन केंद्र मंजूर केले असून याचा फायदा दौंड, पुरंदर व पूर्व हवेलीसाठी होणार आहे. उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील कांचन सिटी येथे दोन एकर जागेत हे केंद्र उभारण्यात येणार असून यासाठी पीएमआरडीएने अग्निशमन केंद्र बांधणीसाठी तब्बल ११ कोटी ४ लाख २९ हजार ७६० रुपयांचा निधीहि वर्ग केला असल्याची माहिती जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य व यशवंत कारखान्याचे संचालक संतोष कांचन यांनी दिली आहे.

पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे, व अग्निशमन विभागाचे प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांनी बुधवारी (ता. २६) उरुळी कांचन येथे नव्याने होणाऱ्या अग्निशमन केंद्रासाठी निधी वर्ग झाल्याने लवकरच या कामाची निविदा काढण्यात येणार असल्याची माहिती दिली. संतोष कांचन यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्याकडे मागील अनेक वर्षांपासून वारंवार पाठपुरावा सुरु ठेवला होता. त्यांच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. त्यामुळे पूर्व हवेलीसह परीसरातील नागरिकांकडून तसेच व्यापारी वर्गाकडून संतोष कांचन यांचे कौतुक केले जात आहे.

नव्याने होणाऱ्या अग्निशमन केंद्रामुळे दौंड, पुरंदर व पूर्व हवेलीसह परिसरात होणाऱ्या दुर्घटनांवर तातडीने उपाययोजना उपलब्ध होणार असल्याने दुर्घटनेची तीव्रताही कमी होणार आहे. त्यामुळे पूर्व हवेलीतील कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, उरुळी कांचन अशी मोठी व झपाट्याने विकसित होणारी गावे असून येथे वारंवार आगीच्या घटना घडतात.

पान २ वर

## संक्षिप्त

### २८ ऑगस्टला मध्यवर्ती भागात वाहतूक बदल; अथर्वशीर्ष पठणाला महिला भाविकांची मोठी उपस्थिती अपेक्षित

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टतर्फे ऋषीपंचमी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमामुळे गुरुवारी २८ ऑगस्ट रोजी मध्यवर्ती भागातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत. पहाटेपासून हा कार्यक्रम सुरू होणार असून, पठण संपेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज रस्ता, अप्पा बळवंत चौक ते हुतात्मा चौक (बुधवार चौक) आणि लक्ष्मी रस्ता परिसरात वाहतूक बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली. हा कार्यक्रम पहाटे पाच वाजल्यानंतर सुरू होईल. या वेळी मोठ्या संख्येने महिला भाविक उपस्थित राहतात. त्यामुळे गर्दी टाळण्यासाठी पोलिसांनी पर्यायी वाहतूक व्यवस्था केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज रस्ता (जिजामाता चौक ते रामेश्वर चौक), अप्पा बळवंत चौक ते हुतात्मा चौक (बुधवार चौक) आणि लक्ष्मी रस्ता परिसरातील विजय मारुती चौक ते बेलबाग चौक या दरम्यानची वाहतूक पूर्णपणे बंद राहील.

छत्रपती शिवाजी रस्त्यावरून जिजामाता चौकातून स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनांना गणेश रस्ता, फडके हौद चौक, देवजीबाबा मंदिर चौकातून उजवीकडे वळून महाराणा प्रतापसिंह रस्ता, हमजेखान चौक, गोविंद हलवाई चौक या मार्गाने मंडईतील गोटीराम भैय्या चौकातून स्वारगेटकडे जावे लागणार आहे. तसेच अप्पा बळवंत चौकातून बुधवार चौकाकडे जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. वाहनचालकांनी अप्पा बळवंत चौकातून जाण्यासाठी बाजीराव रस्ता, फुटका बुरुज चौक, शनिवारवाडा, छत्रपती शिवाजी रस्ता आणि जिजामाता चौक या मार्गाचा वापर करावा. याशिवाय लक्ष्मी रस्त्यावर विजय मारुती चौक ते सोन्या मारुती चौक या दरम्यानची वाहतूक आवश्यकतेनुसार वळविण्यात येईल. वाहनचालकांनी सोन्या मारुती चौकातून बोहरी आळी, मिर्झा गालिब चौक, नेहरू चौक आणि गोटीराम भैय्या चौकमार्गे इच्छितस्थळी जावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### वैष्णोदेवी यात्रा मार्गावर भूस्खलन; ३० भाविकांचा मृत्यू, बचावकार्य वेगाने सुरू

**जम्मू :** जम्मूमध्ये गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाने हाहाकार माजला आहे. पावसामुळे जम्मू-काश्मीरमधील कटरामध्ये वैष्णोदेवी मंदिराजवळ मोठी दुर्घटना घडली. या ठिकाणी दरड कोसळल्यामुळे मोठं नुकसान झालं असल्याची माहिती मिळत आहे. ही घटना मंगळवारी २६ ऑगस्ट रोजी घडली. या दुर्घटनेत ३० भाविकांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर काही भाविक जखमी आहेत. सध्या या ठिकाणी बचावकार्य वेगाने सुरु असून, या ठिकाणी ढिगाऱ्याखाली अडकलेल्या भाविकांना बाहेर काढण्यात येत आहे. घटनास्थळी भारतीय लष्कर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) आणि इतर बचाव पथके युद्धपातळीवर काम करत आहेत. दरम्यान, जम्मू आणि काश्मीर सरकारने या दुर्घटनेची गंभीर दखल घेतली असून, मदत आणि माहिती देण्यासाठी हेल्पलाइन डेस्क सुरू केला आहे. या हेल्पलाइन क्रमांकांवरून नागरिक आपल्या कुटुंबातील सदस्यांबद्दल माहिती मिळवू शकतात. मंगळवारी दुपारच्या सुमारास कटरामधील अर्धकुंवारी येथील इंद्रप्रस्थ भोजनालयाजवळ भूस्खलन झालं. या घटनेत काही वेळातच ८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली. तर २० जण जखमी झाले असल्याचं सांगण्यात आलं होतं. पण त्यानंतर मृतांचा आकडा ३० वर गेला. भूस्खलनाच्या भीषण दुर्घटनेनंकर वैष्णोदेवी यात्रा तात्पुरती स्थगित करण्यात आली असून, नागरिकांना या ठिकाणी येण्यास मनाई केली.

### पावसाचा फटका अन् पालेभाज्यांना कवडीमोल भाव

**दौंड :** पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यासह परिसरातील भाजीपाला उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. गेल्या काही दिवसांपासून शेपू आणि पालकाच्या दरात मोठी घसरण झाली असून, जुडीमागे मिळणारे उत्पन्न अतिशय कमी झाले आहे. या दरांमध्ये अचानक झालेल्या घसरणीमुळे शेतकऱ्यांनी पिकवलेल्या भाजीपाल्याचा वाहतूक खर्च, मजुरी आणि खतांचा खर्चही वसूल होत नाहीये. गेल्या महिन्यात झालेल्या पावसामुळे पालकासारख्या पालेभाज्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. बाजारात अचानक वाढलेली आवक हे दर घसरण्याचे प्रमुख कारण आहे. काही दिवसांपूर्वी ३० ते ४० रुपये जुडी दराने विकला जाणारा पालक आता फक्त १० ते १५ रुपये जुडी दराने विकला जात आहे. शेतकऱ्यांनी याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. एका स्थानिक शेतकऱ्याने सांगितले कि, ''आम्ही मेहनत करून भाजी पिकवली, पण आता खर्चही निघत नाहीये. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.'' दरम्यान, दर घसरल्यामुळे ग्राहकांना मात्र ताजी आणि स्वस्त भाजी मिळत आहे. ही एक दिलासादायक बाब असली तरी, शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले आहे. एका बाजूला पावसाने पिकांचे नुकसान होत असताना, दुसऱ्या बाजूला कमी दरामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. दरम्यान, यावर प्रशासन काय तोडगा काढणार ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# पुणे जिल्ह्यातील आरोग्य केंद्रात औषधांचा तुटवडा

**पुणे, ता. २७ :** पुणे जिल्हा परिषदेच्या सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रात मागील दोन महिन्यांपासून खोकला औषध, लोहयुक्त गोळ्या, श्वानदंश लस, कॅल्शियमच्या गोळ्या व अँटिबायोटिक औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे. तर गेल्या एक वर्षापासून जीवनसत्व अ ची लस उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. लहान मुलांसह रुग्णांना औषधांची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे जिल्हा आरोग्य विभाग हा नागरिकांच्या आरोग्याच्या समस्येवर गाफील असल्याचे दिसून येत आहे.



पुणे जिल्ह्यात १०२ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ५३९ उपकेंद्रे कार्यरत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये स्थानिक रुग्णांवर प्राथमिक उपचार केले जातात. यामध्ये प्रामुख्याने सर्दी, ताप, डोकेदुखी, अंगदुखी, जखम होणे, उलटी, जुलाब, खोकला, रक्तदाब (बीपी) आणि मधुमेह (शुगर) यासारख्या आजारांवरील उपचारांचा समावेश असतो. सध्या जिल्ह्यातील वातावरण बदलले आहे. या वातावरण बदलामुळे खोकला, सर्दी आणि तापाचे रुग्ण संख्या वाढली आहे. त्यामुळे अचानक रुग्ण संख्या वाढल्याने या आजारांवरील औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे.

हवेली तालुक्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा तुटवडा असल्याने रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांना औषधांसाठी सतत चकरा माराव्या लागत आहेत. आर्थिक क्षमता नसतानाही बाहेरून महागडी औषधे विकत घ्यावी लागत असल्याने रुग्णांचे हाल होत आहेत. जीवनावश्यक औषधे, गोळ्यांसाठी वाढत्या महागाईत गरीब रुग्णांनी जायचे कुठे? औषधे कुठून आणायची? असा प्रश्न आता सामान्य नागरिकांना पडत आहे. औषध भांडारातील तुटवड्याचा आर्थिक फटका रुग्णांना बसत आहे.

> **“ मुलाला जीवनसत्व अ ची लस देण्यसाठी एक वर्षापासून प्रयेक महिन्याला हेलपाटे मारीत आहे. परंतु, अद्यापपर्यंत लस भेटली नाही. फक्त पुढच्या महिन्यात या असे वारंवार सांगितले जात आहे. माझ्या मुलाला जर काही झाले तर याला पूर्णपणे हा आरोग्य विभाग असणार आहे.**
> – **खंडू चौधरी,** नागरिक, पुणे

दरम्यान, आरोग्य विभागात औषधांचा तुटवडा असल्याने गरीब आणि गरजू रुग्णांना सध्या औषधांची प्रतीक्षा करावी लागत आहे. औषधांचा पुरवठा सुरळीत होण्यासाठी आणखी काही दिवसांचा कालावधी लागणार आहे. नागरिकांना अजून पुढील काही दिवस औषधांपासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे जिल्हा आरोग्य विभाग किती दिवसांमध्ये औषधांचा पुरवठा सुरळीत करेल. तेही पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

या संदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी सचिन देसाई यांच्या संपर्क केला असता, ते म्हणाले, याबाबत अधिक माहिती तुम्ही ज्या त्या प्राथमिक आरोग्य केंद्रातून घ्या. त्यांच्याशीच एकदा बोलून घ्या. असे म्हणून हातवर केले. त्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी फोन न उचलल्याने त्यांची प्रतिक्रिया समजू शकलेली नाही.

पुणे जिल्ह्यातील गोरगरीब रुग्ण मोठ्या हॉस्पिटल मध्ये पैशांअभावी जाऊ शकत नाहीत. भाकरीचा चंद्र दिसायलाच त्यांची ओढाताण होते. करोना महामारी पश्चात सर्वच नागरिकांचे आर्थिक व शारीरिक आरोग्य बिघडले आहे. वेगवेगळ्या कारणांमुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक पुढे ढकलली गेली. त्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये फक्त आणि फक्त आधिका-यांचे राज्य थोडक्यात बाबुगिरी आहे. बोलायला कुणीच नाही. त्यामुळेच गरीब रुग्णांना कुणी वालीच राहिलेला नाही. जिल्हा आरोग्य आधिकारी पत्रकारांना जर उडवाउडवीची उत्तरे देत असेल तर सामान्य जनतेशी कोणत्या भाषेत बोलत असतील याची कल्पनाच न केलेली बरी. प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय आधिका-यांची त-हा अजून वेगळीच आहे. जनतेने भरलेल्या करातूनच आपला पगार होतो. हेच त्यांना माहित नसेल तर जिल्ह्यातील रुग्णसेवाच गॅसवर आहे असे खेदाने नमूद करावे लागते.

# भावेखलचा अविष्कार मादगुडे भारतीय नौदलात दाखल

**विशाल शिंदे**

**भोर, ता. २७ :** भोर तालुक्यातील भावेखल गावचा अविष्कार अंकुश मादगुडे याने इंडियन नेव्हीत स्थान मिळवत भोर तालुक्याचा अभिमान वाढवला आहे. एसएसआर मेडिकल, टेक्निकल तसेच एमआर. शेफ या तिन्ही परीक्षेत उत्तीर्ण होत त्याची भारतीय नौदलात (Indian Navy) निवड झाली आहे.



शेतकरी कुटुंबात जन्मलेला अविष्कारचे वडील अंकुश मादगुडे शेती करतात तर आई सारिका मादगुडे गृहिणी असून शेतीकामात मदत करतात. घरच्या परिस्थितीवर मात करत अविष्कारने चौथीपर्यंत भावेखल जिल्हा परिषद शाळा, दहावी आपटी येथील माध्यमिक विद्यालय, तर पुढील शिक्षणासाठी भोर येथील अनंतराव थोपटे महाविद्यालय निवडले. तो सध्या विज्ञान शाखेच्या पदवीच्या अंतिम वर्षात शिकत आहे.

अकरावीत एनसीसीमध्ये सामील झाल्यापासून भारतीय सैन्यात जाण्याचे स्वप्न त्याच्या मनात बाळगले गेले. बारावीनंतरच्या पहिल्या प्रयत्नात मेडिकल अनफिट ठरल्यावरही त्याने हार मानली नाही. सातत्याने अभ्यास व सराव करत अखेर एसएसआर मेडिकलमध्ये १०० पैकी ६०, टेक्निकलमध्ये ६८ (मेरीट – ४२) तर एम.आर. शेफमध्ये ५० पैकी ३७ (मेरीट – ३०) गुण मिळवत त्याने नेव्हीत दाखल होण्याचे स्वप्न पूर्ण केले. साडेचार वर्षे रोज भावेखलवरून भोरला ये-जा करत अविष्कारने कॉलेजचे शिक्षण, अभ्यासिका व मैदान यामध्ये समतोल साधला. या प्रवासात पोर्णिमा जावीर (धैय्य अभ्यासिका), सुरेखा चिकणे (मुख्याध्यापिका, आपटी विद्यालय), तसेच संदीप उल्हाळकर (प्राध्यापक, थोपटे कॉलेज) यांचे मार्गदर्शन लाभले. अविष्कारबरोबरच सुयश मचिंद्र चव्हाण याचीही नेव्हीत भरती झाली आहे.

**अविष्कार मादगुडे म्हणाला**

''दररोज कॉलेजच्या वेळे व्यतिरिक्त अभ्यासिकेत अभ्यास तर मैदानावर सराव केला. मेहनतीचे फळ मिळाल्याचा आनंद आहे. आई-वडिलांनी दिलेले प्रोत्साहन, पाठबळ हेच माझ्या यशामागचे बळ आहे. अपयश आले तरी खचून न जाता प्रयत्न करत राहिले, तर हमखास यश मिळतेच.''

अविष्कारच्या या कामगिरीमुळे भावेखल व भोर तालुक्यात अभिमान व आनंदाचे वातावरण असून सर्वत्र त्याचे अभिनंदन होत आहे.

### विवाहबाह्य संबंधातील तरुणीची प्रियकराकडून हत्या

**मैसूर :** कर्नाटकातील मैसूर जिल्ह्यातील गेरासनहल्ली गावात एक धक्कादायक घटना घडली आहे. रक्षिता (वय २०) हिचे लग्न केरळमधील सुभाष नावाच्या युवकासोबत झाले होते. दोघांना दोन वर्षांचा मुलगा आहे. मात्र लग्नानंतरही रक्षिता तिच्या जुना प्रियकर सिद्धाराजूसोबत संपर्कात होती. ती माहेरी आल्यावर सासूची तब्येत बिघडली असे सांगत प्रियकराला भेटायला निघाली.

दोघे कप्पाडी मंदिरात दर्शनाला गेले आणि नंतर सालिग्राम भेर्या गावातील एका लॉजमध्ये पोहोचले. याठिकाणी वादातून सिद्धाराजूने पूर्वनियोजित कट रचून रक्षिताच्या तोंडात जिलेटिनची कांडी ठेवली व स्फोट घडवून आणला. या भीषण घटनेत रक्षिताचा जागीच मृत्यू झाला. बनाव रचण्यासाठी सिद्धाराजूने मृत्यू मोबाईल बॅटरी स्फोटामुळे झाला असे कर्मचाऱ्यांना सांगितले. मात्र संशय आल्याने पोलिसांना माहिती देण्यात आली.

## पुणे, मुंबईसह अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज
### नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**पुणे, ता. २७ :** महाराष्ट्रात मान्सून सक्रिय असून, आज अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यासह जोरदार सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता असून नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**शहरांमधील हवामानाचा अंदाज :**

पुणे: शहरात आज दिवसभर वातावरण ढगाळ राहील. काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे, तर वाऱ्याचा वेगही वाढलेला दिसून येईल. कमाल तापमान २९ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान २३ अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याचा अंदाज आहे.


मुंबई: मुंबई आणि उपनगरातही सकाळपासूनच ढगाळ वातावरण आहे. जोरदार सरी कोसळण्याची शक्यता आहे, ज्यामुळे सखल भागांत पाणी साचू शकते. वाऱ्याच्या वेगात वाढ होण्याची शक्यता असून, नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घ्यावी.

नागपूर: विदर्भातही पावसाची स्थिती कायम असून, आज नागपूरमध्ये गडगडाटासह पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे.

राज्यातील अनेक भागांमध्ये शेती कामांना गती मिळाली असून, शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मात्र, काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे नद्यांना पूर येण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. मच्छिमारांनाही समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुढील २४ ते ४८ तासांत राज्यात पावसाचा जोर वाढू शकतो, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

## सिंहगड किल्ल्यावर जाण्यासाठी आता नवीन नियम
# ऑनलाइन नोंदणीनंतरच मिळणार प्रवेश

**पुणे, ता. २७ :** महाराष्ट्राची ओळख असलेल्या सिंहगड किल्ल्याला भेट देण्यासाठी आता पर्यटकांना ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. वन विभागाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला असून 'किल्ले सिंहगड' नावाच्या मोबाइल ॲपद्वारे ही पूर्वनोंदणी करावी लागणार असून, असा नियम लागू करणारा सिंहगड हा राज्यातील पहिला किल्ला ठरला आहे. गेल्या काही वर्षांपासून, विशेषतः सुट्टीच्या दिवशी आणि पावसाळ्यात, सिंहगडावर येणाऱ्या पर्यटकांची संख्या १२,००० पेक्षा जास्त असते. यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. या समस्येवर नियंत्रण आणण्यासाठी वन विभागाने पर्यटकांची दररोजची प्रवेश मर्यादा निश्चित करण्याचाही निर्णय घेतला आहे.



**ॲपमध्ये काय आहे?**

हे ॲप अँड्रॉइडच्या प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे आणि लवकरच आयफोन वापरकर्त्यांसाठीही उपलब्ध होईल. या ॲपमध्ये पर्यटकांसाठी अनेक उपयुक्त माहिती देण्यात आली आहे.

**ऐतिहासिक माहिती :** सिंहगड किल्ल्याचा इतिहास आणि वनसंपदा तसेच वन्यजीवांविषयी माहिती.

**सुरक्षिततेसाठी अलर्ट :** वाहतूक कोंडी, मधमाशांचा हल्ला किंवा इतर आपत्कालीन स्थितीसाठी अलर्ट

**इतर सुविधा :** गडावरील पार्किंगची माहिती आणि वणवा किंवा इतर नैसर्गिक आपत्कालीन स्थितीचा अलर्ट

या उपक्रमामुळे पर्यटकांचा अनुभव अधिक सुरक्षित आणि सोयीचा होईल. वन विभागाचे अधिकारी मनोज बारबोले यांनी सांगितले की, ''या ॲपमुळे पर्यटकांची संख्या आणि गडावरील परिस्थितीवर लक्ष ठेवणे सोपे होईल. गर्दी वाढल्यास तातडीने प्रवेश बंद करण्याचा निर्णय घेता येईल.' सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर ही योजना राबवली जाईल आणि त्यानंतर ॲपद्वारे नोंदणी पूर्णपणे बंधनकारक केली जाईल.

# गणेशोत्सवासाठी पुणे पोलीस सज्ज
### सुरक्षेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

**पुणे, ता. २७ :** पुणे शहरात यंदाचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. गणेशोत्सवादरम्यान शहर आणि परराज्यातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या सुरक्षेसाठी पुणे पोलीस दलाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत एक व्यापक नियोजन केले आहे. भाविकांच्या सुरक्षेसाठी १३० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे, 'एआय' (AI) आधारित व्हिडिओ ॲनालिटिक्स, ड्रोनद्वारे हवाई पाळत (एरियल सर्व्हिलन्स) आणि जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीमचा वापर केला जाणार आहे. तसेच, अँटी-ड्रोन गन्स, ५० मेटल डिटेक्टर आणि १५० हँड-हेल्ड डिटेक्टर्सदेखील तैनात केले आहेत. महिलांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी स्वतंत्र पथके, चेन स्नॅचिंग आणि वाहन चोरी रोखण्यासाठी विशेष दले आणि गुन्हे शाखेची पथके सतत गस्त घालणार आहेत.

**विस्तृत पोलीस बंदोबस्त**

उत्सवाच्या मुख्य मिरवणुका असलेल्या ६ आणि ७ सप्टेंबर रोजी सुमारे पोलीस कर्मचारी, १,१०० होमगार्ड आणि एसआरपीएफ कंपनीचा मोठा फौजफाटा रस्त्यावर तैनात असणार आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, पुणेकरांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करून हा उत्सव सुरक्षित आणि शांततामय पद्धतीने साजरा करावा. ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक नियम लागू केले गेले आहेत. मेट्रो स्थानकांवरील गर्दीचे नियोजन करण्यासाठीही विशेष व्यवस्था केली आहे. मागील वर्षी नियमांचे पालन न केलेल्या मंडळांना यंदा कोणताही प्रतिबंध नाही, पण त्यांना नियमांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# रस्त्याच्या कामावरून ठेकेदाराला मारहाण
### शेतातून रस्ता काढण्यावरून वाद पेटला

**पुणे, ता. २७ :** शासकीय रस्त्याचे काम करण्यासाठी गेलेल्या ठेकेदाराला 'तु आमच्या शेतातून रस्ता कसा काढतो, हे पाहतोच' असे म्हणत बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी वकिलासह दोघांवर बारामती तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत २४ वर्षीय शासकीय ठेकेदाराने बारामती तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ॲड. सारथी दिनेश पानसरे आणि मयुर विकास पानसरे (दोघे रा. शिर्सुफळ, ता. बारामती) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २५ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता शिर्सुफळ येथे घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी २०२१ पासून सरकारी कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करत आहेत. बांधकाम विभाग, बारामती यांच्याकडून त्यांना शिर्सुफळ गोजुबावी रोडचे काम सोपविण्यात आले होते. ते आपल्या सहकाऱ्यांसह २५ ऑगस्ट रोजी काम सुरू करत असताना दुपारी १२ वाजता आरोपी घटनास्थळी आले. त्यांनी रोडचे काम कोण करत आहे, असे विचारून फिर्यादीकडे गेल्यानंतर त्यांना मारहाण सुरू केली.

ॲड. सारथी पानसरे यांनी फिर्यादीला हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून अश्लील शिवीगाळ केली. तसेच, ''तु येथे आमच्या शेतातून रस्ता काढतोस, तुला आणि तुझ्या मशिनींना जाळून टाकीन,'' अशी धमकी दिली. त्यांना दाखविलेल्या कागदपत्रांचा अपमान करून पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांनाही अश्लील शिवीगाळ करण्यात आली.

मयुर पानसरे यांनीदेखील ''तु इथे काम कसा करतोस ते पाहतोच,'' असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली. या हल्ल्यात फिर्यादीच्या कानातील हिऱ्याचा खडा पडून गहाळ झाला. तेथील ग्रामस्थांनी मध्यस्थी करून भांडण सोडवले. यानंतर ठेकेदाराने रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस फौजदार वाघ करत आहेत.

# लोणी काळभोरमध्ये घरात आढळला अर्धनग्न अवस्थेत मृतदेह

**लोणी काळभोर, ता. २७ :** नातेवाईकाला भेटण्यासाठी आलेल्या एकाचा राहत्या घरात अर्धनग्न अवस्थेत मृतदेह आढळल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता.हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील माळी मळा परिसरात घडली असून आज (दि. २७) बुधवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अशोक डुंभडे (वय ५०) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, विकी शेंडकर यांची माळी मळा परिसरातील मारुती मंदिराजवळ एक इमारत आहे. शेंडकर यांनी हॉटेलमध्ये काम करणाऱ्या एका व्यक्तीला भाडेतत्त्वावर रूम भाड्याने दिली होती. शेंडकर यांच्या भाडेकरूकडे त्याचे नातेवाईक अशोक डुंभडे हे आले होते. नातेवाईक घरी आहेत म्हणून शेंडकर यांचे भाडेकरू तीन दिवसांपासून कामानिमित्त बाहेर गावी गेले होते.

दरम्यान, दोन दिवस झाले तरी घराचा दरवाजा उघडला नाही. आवाज दिला तरी कोणीही प्रतिसाद दिला नाही. म्हणून शेंडकर यांनी या घटनेची माहिती लोणी काळभोर पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नाळे, सहाय्यक फौजदार विनोद कांबळे, पोलिस हवालदार तेजस जगदाळे, हणमंत शिंगाडे व त्यांचे सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने घराचा दरवाजा तोडला असता, अशोक डुंभडे यांचा मृतदेह अर्धनग्न अवस्थेत आढळून आला.

पोलिसांनी अशोक डुंभडे याचा मृतदेह ताब्यात घेऊन महाराजा रुग्णवाहिकेच्या मदतीने पुण्यातील ससून रुग्णालयात सर्व शवविच्छेदनासाठी पाठविला आहे. शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतर मृत्यूचे खरे कारण समोर येईल. मृतदेहाची प्राथमिक ओळख पटली असली तरी पडताळणी करून योग्य ओळख पटविण्याचे पोलिसांसमोर आव्हान उभे आहे. तरी पुढील तपास लोणी काळभोर पोलीस करीत आहेत.

### अश्लील व्हिडिओवरून राग, मुलांचा बापावर हल्ला

**अमरावती, ता. २७ :** अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा येथे एक धक्कादायक घटना घडली आहे. दोन भावांनी मिळून आपल्या वडिलांवर हल्ला करून जखमी केल्याची माहिती समोर येत आहेत. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, वडिलांनी दोन मुलांविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली आहे. ही घटना चिखलदरा तालुक्यातील सोनापूर येथील आहे. मुंगू दांडोळे (वय-४५) असे जखमी झालेल्या वडिलांचे नाव आहे. तर त्यांच्या दोन मुलांची नावं सुमित (वय-१९) आणि अमित (वय-१८) अशी आहेत.

सुमित आणि अमित हे दोघ गुपचूप मोबाईलवर अश्लील व्हिडीओ पाहत होते. हे त्यांच्या वडिलांच्या लक्षात आले आणि त्यांनी दोघांच्याही हातातून मोबाईल हिसकावून घेतला आणि त्यांना कानाखाली मारली. यानंतर वडिलांनी तो मोबाईल विकून टाकला. या घटनेचा राग मनात धरून दोन्ही भावांनी वडिलांवर हल्ला केला. दोघांनी वडिलांना जमिनीवर पाडले आणि सुमितने चाकूने त्यांच्यावर वार केले, या घटनेत दांडोळे गंभीर जखमी झाले. ही घटना १५ ऑगस्ट रोजी घडली. या घटनेनंतर वडिलांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आणि संपूर्ण घटना सांगितली. पोलिस आता या घटनेचा तपास करत आहेत.

# कर्जाच्या ओझ्याने मुलाचा थरारक निर्णय
### बापाच्या मृत्यूनंतर आईवर सपासप वार, परिसरात खळबळ

**रत्नागिरी, ता. २७ :** कर्जाच्या प्रचंड ओझ्याखाली दबलेल्या एका तरुणाने आईची हत्या करून स्वतः आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना रत्नागिरी शहरात घडली आहे. या दुर्दैवी घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे. अनिकेत शशिकांत तेली (वय-२५) असे या तरुणाचे नाव असून आई पूजा शशिकांत तेली (वय-४५) यांचे निधन झाले आहे.

कुटुंबावर सुमारे १ कोटी रुपयांचे कर्ज होते. दोन महिन्यांपूर्वीच अनिकेतच्या वडिलांनी कर्जाला कंटाळून आत्महत्या केली होती. वडिलांच्या मृत्यूनंतरही कर्जदारांनी पैशांसाठी अनिकेतकडे सतत तगादा लावला होता. दरम्यान, सततच्या दबावामुळे वैतागलेल्या अनिकेतने धारदार चाकूने आपल्या आईच्या गळ्यावर वार केले. आईच्या हत्येनंतर त्याने स्वतःच्या हाताच्या नसा कापून घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. गंभीर जखमी झालेल्या अनिकेतला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनिकेतच्या वडिलांनी मुलासाठी अनेक लोकांकडून कर्ज घेतले होते आणि अनिकेतनेही काही ठिकाणांहून कर्ज घेतले होते. कर्जाचा बोजा असह्य झाल्याने त्यांनी आत्महत्या केली होती.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या दुर्दैवी घटनेची पुढील चौकशी पोलीस करत आहेत. या घटनेमुळे कर्जाच्या प्रश्नाची गंभीरता पुन्हा एकदा समोर आली आहे.

# गणेशोत्सवासाठी पुण्यातून कोकणात २३० एसटी

## ट्रॅव्हल्सच्या तिकिट दरात झाली वाढ

**पुणे, ता. २७ :**कोकणातील गणपती हा सर्वाधिक लोकप्रिय उत्सव मानला जातो. त्यामुळे दरवर्षी लाखो कोकणवासीय आपल्या गावी जातात. यंदाही गणेशोत्सवानिमित्त पुणे विभागातील २३० एसटी बस कोकणात पाठविण्यात आल्या आहेत. यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातून मोठ्या संख्येने भाविक सुरक्षित प्रवासासाठी एसटीची निवड करत आहेत. मात्र, याच काळात खासगी ट्रॅव्हल्सकडून तिकीट दरवाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, ठाणे, रायगड या परिसरात कामानिमित्त स्थायिक झालेल्या कोकणवासीयांची मोठी संख्या आहे. हे सर्वजण एकत्रित येऊन ग्रुपद्वारे आपल्या गावी प्रवास करतात. कोकणात जाणाऱ्या भाविकांना सुरक्षितता आणि विश्वास असल्यामुळे एसटीला आजही प्राधान्य दिले जाते.

गणपती उत्सवासाठी एक महिन्यापूर्वीच बसचे ग्रुप बुकिंग केले जाते. पुणे विभागातून प्रामुख्याने स्वारगेट आणि पिंपरी आगारातून बस सोडल्या जातात. यंदा मागील वर्षाच्या तुलनेत अधिक बस बुक झाल्याचे एसटी प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून रत्नागिरी, चिपळूण, राजापूर, गुहागर, सावर्डे, खेड, माणगाव, दापोली, देवरुख, सावंतवाडी, देवगड, लांजा, साखरपा यांसारख्या ठिकाणी जाणाऱ्या भाविकांनी १४१ बस ग्रुपद्वारे बुक केल्या आहेत. प्रत्येक ग्रुपमध्ये सरासरी ४२ प्रवासी असतात.

कोकणात मोठ्या प्रमाणावर बस पाठविल्या तरी जिल्ह्यातील नियमित वाहतूक विस्कळीत होऊ नये यासाठी एसटी प्रशासनाने नियोजन केले आहे. एका दिवसासाठी बस कोकणात पाठवून पुन्हा माघारी आणल्या जात असल्याने प्रवाशांची गैरसोय होत नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, पुण्यातून राज्यातील विविध भागात धावणाऱ्या एसटी बसपैकी २०० बस कोकणात गेल्यामुळे खासगी ट्रॅव्हल्सकडून तिकीट दर १०० ते २०० रुपयांनी वाढविण्यात आल्याचे समजते. मात्र, प्रवाशांची संख्या कमी असल्याने खासगी बसमध्ये अपेक्षित गर्दी दिसून येत नाही.

कोणत्या आगारातून किती बस कोकणात पाठविण्यात आल्या, त्याची आकडेवारी अशी आहे – शिवाजीनगर २०, स्वारगेट ०५, भोर १०, नारायणगाव २५, राजगुरूनगर २५, तळेगाव १५, शिरूर २५, बारामती ३०, इंदापूर २०, सासवड १५, दांडी १०, मंचर १०. एकूण २३० बस पुणे विभागातून कोकणात रवाना करण्यात आल्या आहेत. यातील काही बस माघारी परतल्या असून, सर्व मार्गावरील वाहतूक सुरळीत सुरू असल्याची माहिती पुणे विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी दिली.



# या गणेशोत्सवात 'आवाज' कमीच!

## जाणून घ्या गणेश मंडळांवरील नवीन निर्बंध



**पुणे, ता. २७ :** यंदाच्या गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणाच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासह पुणे पोलिसांना दिले आहेत. तसेच गणेशोत्सवानंतर ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे पालन झाले की नाही, याचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देशही न्यायाधिकरणाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर यंदा गणेशोत्सवाच्या ११ दिवसांच्या कालावधीत शहरातील २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी आवाजाची पातळी मोजली जाणार आहे.

**गणेशोत्सवातील** ध्वनिप्रदूषणाबाबत डॉ. कल्याणी मांडके यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीदरम्यान न्यायाधिकरणाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पुणे पोलिसांना हे आदेश दिले. न्यायाधिकरणाने गणेश मंडळांच्या ठिकाणी आवाजाची पातळी मोजण्याबरोबरच प्रत्येक मंडळासाठी ध्वनिक्षेपकाच्या आवाजाची मर्यादा निश्चित करण्याचेही निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रदूषण नियंत्रण मंडळाने ११ दिवसांच्या गणेशोत्सव काळात २०० मंडळांच्या ठिकाणी आवाजाची पातळी तपासण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पुणे पोलिसांनी संयुक्तपणे ध्वनिप्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात, असे न्यायाधिकरणाने स्पष्ट केले आहे. या संदर्भात विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त संदीप भाजीभाकरे यांनी पोलिसांकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती न्यायाधिकरणासमोर दिली. सर्व पोलीस ठाण्यांना ध्वनिक्षेपकांचा आवाज कमी ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच एका मंडळासाठी ध्वनिक्षेपकाची कमाल मर्यादा १०० वॉट निश्चित करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

गेल्या वर्षी न्यायाधिकरणाने गणेशोत्सवाच्या काळात ध्वनिप्रदूषणाची पातळी तपासण्याचे निर्देश दिले होते. त्या वेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी ध्वनिप्रदूषणाच्या नोंदी घेतल्या होत्या. या नोंदींमध्ये सर्व मंडळांनी ध्वनिप्रदूषणाच्या मर्यादेचे उल्लंघन केले असल्याचे समोर आले होते. मात्र, गेल्या वर्षी झालेल्या ध्वनिप्रदूषणाच्या प्रकरणांमध्ये कोणती कारवाई करण्यात आली याची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पुणे पोलिसांनी जाहीर केलेली नव्हती. त्यामुळे मागील सुनावणीवेळी न्यायाधिकरणाने त्याबाबत विचारणा केली होती.

शहरातील ध्वनिप्रदूषणाशी संबंधित गुन्ह्यांची आकडेवारी पाहता २०२४ मध्ये १२४ प्रकरणे नोंदली गेली होती, तर २०२५ मध्ये केवळ ६ प्रकरणे नोंदली गेली आहेत. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार यंदा गणेशोत्सवाच्या ११ दिवसांच्या काळात २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी आवाजाची पातळी मोजली जाणार असून, त्याचबरोबर शहरातील १५ महत्त्वाच्या चौकांमध्ये ४ दिवस २४ तास आवाजाची पातळी मोजण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी बाबासाहेब कुकडे यांनी दिली.

# खून करून पळालेल्या दोन आरोपींना शिरूर पोलिसांनी केले जेरबंद!

**अक्षय टेमगिरे**



**शिरूर, ता. २७ :** शिरूर पोलिसांनी खून करून पसार झालेल्या दोन आरोपींना सापळा रचून काही दिवसांतच जेरबंद केले आहे. या कारवाईमुळे शिरूर पोलीस ठाण्याची उल्लेखनीय कामगिरी अधोरेखित झाली आहे.

१९ ऑगस्ट रोजी सकाळी ते २० ऑगस्ट रोजी दुपारच्या दरम्यान मौजे कवठे येमाई ता. शिरूर येथील शेतात घडलेल्या खुनाच्या प्रकरणात देवराम नानाभाऊ टेके (वय ५० वर्ष) यांच्यावर लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला करून त्यांचा खून करण्यात आला होता. आरोपी सुनिल उर्फ शैलेश सुखदेव मुळे (वय २८ वर्ष) व रमेश बारकु पवार (वय २३ वर्ष दोघे रा. फाकटे, ता. शिरूर) यांनी उधार दिलेले पैसे परत मागितल्याच्या रागातून टेके यांचा खून केला. खुनानंतर मृतदेह उसाच्या शेतात टाकून, त्याच्याजवळील सोन्याचे दागिने व मोबाईल घेऊन आरोपी पसार झाले होते.

या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याच्या गांभीर्याची दखल घेऊन पोलीस निरीक्षक संदेश केंजळे व संतोष घोळवे यांनी विशेष तपास पथके तयार करून आरोपींचा शोध सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण तसेच गुप्त माहितीच्या आधारे आरोपी सरदवाडी येथे पुणे-अहमदनगर महामार्गावरील रायगड हॉटेलजवळ लपल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ सापळा रचून दोन्ही आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले.

पोलिस चौकशीत आरोपींनी खुनाची कबुली दिली असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

या यशस्वी कारवाईत पोलीस अधीक्षक संदिप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक दिपक करांडे, पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, दिलीप पवार तसेच पोलीस कर्मचारी नाथासाहेब जगताप, नितीन सुद्रीक, अनिल आगलावे, शरद वारे, अरुण उबाळे, शिवाजी बनकर, नितेश थोरात, विजय शिंदे, निरज पिसाळ, सचिन भोई, निखील रावडे, सागर बोराडे, सोनाजी तावरे, संतोष बनसोडे, शंकर बल्लाळ, मनोज मोरे, रविंद्र आव्हाड, अजय पाटील, भाउसाहेब ठोसरे यांनी ही कामगिरी यशस्वी पार पाडली आहे.

# पुण्यात फ्लॅट घेण्यासाठी २० लाखांची मागणी

## विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह दोघांवर गुन्हा दाखल



**पुणे, ता. २७ :** माहेराहून २० लाख रुपये आणण्यासाठी एका विवाहितेचा शारीरिक आणि मानसिक छळ केल्याप्रकरणी तिचा पती, सासू आणि नणंद यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुण्यात फ्लॅट घेण्यासाठी ही पैशांची मागणी करण्यात आल्याचे पीडित महिलेने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. तिचा पती अमेरिकेत नोकरी करतो. लग्नानंतर सासूने पीडितेचे स्त्रीधन ताब्यात घेतले आणि तिचा पगारही स्वतःकडे देण्याची सक्ती केली. पती अमेरिकेत गेल्यानंतर सासू आणि नणंदेने ''सासरमध्ये कायमचे राहायचे असेल, तर माहेराहून २० लाख रुपये घेऊन ये'' अशी मागणी करत तिचा मानसिक छळ सुरू केला.

पीडित महिला अहमदनगर येथील रहिवासी आहे. तिने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, २०२४ मध्ये पीडितेचे लग्न मोठ्या थाटामाटात झाले होते. लग्नानंतर सासरच्या मंडळींनी तिच्याकडे माहेराहून २० लाख रुपये आणण्याची मागणी सुरू केली. पैसे आणण्यास नकार दिल्यावर पती, सासू आणि नणंद यांनी छळ करण्यास सुरुवात केली.

जेव्हा पती अमेरिकेतून परत आला, तेव्हा त्यानेही हीच मागणी केली. इतकेच नव्हे, तर त्यांनी पीडितेच्या माहेरी जाऊन तिच्या भावाला लाथाबुक्क्यांनी मारहाणही केली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222)
मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित के ले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित के ले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

## प्राईम लाईफ



# वजन कमी करण्यासाठी, चिया बिया गुणकारी

चिया बियांमध्ये फायबर, ॲंटिऑक्सिडंट्स, कॅल्शियम (Health) आणि लोह यांसारखे घटक असतात. तसेच चिया बिया चवहीन असतात.

**जाणून घ्या चिया बिया खाण्याचे फायदे**

१) जेव्हा तुमची पचनक्रिया योग्य असते, तेव्हा तुम्ही अन्न जलद पचवू शकता. चिया बियांमध्ये भरपूर फायबर आणि प्रथिने असतात. ज्याच्या सेवनाने पचनसंस्था निरोगी राहण्यास आणि वजन जलद कमी होण्यास मदत होते.

२) चिया बियांमध्ये व्हिटॅमिन सी आणि ॲंटीऑक्सिडंट्स आढळतात, जे शरीराला डिटॉक्स करतात आणि शरीरातील अतिरिक्त चरबी काढून टाकतात. यामुळे शरीरातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण संतुलित राहते. चिया बियांच्या सेवनाने कोलेस्ट्रॉल आणि हृदयाशी संबंधित समस्या कमी होण्यास मदत होते.

३) चिया बियांचे सेवन केल्याने अपचन, बद्धकोष्ठता आणि गॅसच्या यांसारख्या समस्या कमी होतात.

४) चिया बियांमध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरस आढळतात, जे हाडे मजबूत करण्यास मदत करतात.

५) चिया बियांमध्ये प्रथिने व मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. यामुळे त्वचा नितळ, चमकदार आणि अधिक तरुण बनते.

**टीप :** चिया बियांना कच्चे न खाता भिजवून, भाजून अथवा इतर पेय, पदार्थांमध्ये त्याचा वापर करून सेवन करावे.दिवसभरात चिया बियांचे २ चमचेपेक्षा जास्त सेवन करू नये. चिया बियांच्या अतिसेवनाने अपचन होऊ शकते.

# २ कोटींच्या व्हेल उलटी तस्करीत तिघे अटकेत

## पुणे वनविभागाची धडाकेबाज कामगिरी

**हनुमंत चिकणे**



**पुणे, ता. २७ :** बेकादेशीररीत्या स्पर्म व्हेल माशाच्या उलटीची (अंबरग्रीस) तस्करी करणाऱ्या तीन आरोपीना पुणे वन विभागाने बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्याकडून सुमारे दोन कोटी रुपयांची दोन किलो व्हेल माशाची उलटी जप्त करण्यात आली आहे. पुण्यातील कोथरूड -चांदणी चौक परिसरात हि कारवाई करण्यात आली असून एका फरार आरोपीचा शोध सुरू आहे.

याप्रकरणात स्पर्म व्हेल माशाची उलटी बाळगल्याप्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी तिघांना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना पोलिस कोठडी सुनाविण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, स्पर्म व्हेल माश्याची उलटी (अंबरग्रीस) ही आंतरराष्ट्रीय काळ्या बाजारात विकली जाणार असल्याची माहिती वन विभागाला गुरुवारी (ता. २१) मिळाली होती. त्यानुसार वनविभागाने कोथरूड -चांदणी चौक परिसरात सापळा रचून आरोपींना एका चारचाकी गाडीसह ताब्यात घेतले. यावेळी त्यांच्याकडून दोन किलो व्हेल माशाची उलटी जप्त करण्यात आली. इनोव्हा कार मधून ही उलटी जप्त करण्यात आली. याच कारवाई दरम्यान एक आरोपी फरार झाला.

दरम्यान, याप्रकरणी स्पर्म व्हेल माश्याची उलटी (अंबरग्रीस) बाळगणे प्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम २(३२), ९, ३९, ४४, ४८(A), ४९, ५०, ५१, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना ०३ दिवसांची वन कोठडी सुनावली होती. सदरील कोठडीचा कालावधी संपल्यानंतर अटक आरोपींना पुनश्चः न्यायालयात हजर केले असता आरोपींना अतिरिक्त ०३ दिवसांची वन कोठडी सुनावण्यात आली आहे.

दरम्यान, स्पर्म व्हेल माशाची उलटीचा उपयोग प्रामुख्याने महागड्या परफ्यूममध्ये केला जातो. जास्त काळ टिकणार सुगंध तयार करण्यासाठी याचा वापर होत असल्याची माहिती वनविभ्गाकडून देण्यात आला आहे. या प्रकरणात आणखी कोण व्यक्ती सामील आहेत याबाबत तपास सुरू आहे. सदरील प्रकरणाचे रॅकेट दूरवर पसरले असून त्याबाबत सखोल तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी वनसंरक्षक, पुणे आशिष ठाकरे, उपवनसंरक्षक, महादेव मोहिते आणि विभागीय वनअधिकारी (भूमी व कॅम्पा) अमोल थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे वनविभागाचे सहायक वनसंरक्षक विशाल चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी (भांबुर्डा) मनोज बारबोले, वनपरिक्षेत्र अधिकारी (फिरते पथक) ऋषिकेश चव्हाण तसेच पुणे वनविभाग, पुणे च्या अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

# सहकारी महिलेवर जादूटोणा करून संमोहित करण्याचा प्रयत्न

## पुणे जिल्हातील घटनेने खळबळ, आरोपी अटकेत...

**हनुमंत चिकणे**



**इंदापूर, ता. २७ :** नामांकित शासन मान्यताप्राप्त असलेल्या कंपनीतील एका ३१ वर्षीय महिलेचे वशीकरण करण्यासाठी कंपनीतील एका कर्मचाऱ्याने चक्क राखेचा अंगारा टाकून जादूटोणा केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कंपनीतील कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० जुलै ते ५ ऑगस्ट २०२५ दरम्यान हीन घटना घडली आहे.

प्रशांत अंबिके (रा. वालचंदनगर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपी कर्मचाऱ्याचे नाव आहे. ही घटना इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर (ता. इंदापूर) जवळील औरंगाबाद डिस्टिलरी कंपनीत घडली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी आरोपी प्रशांत अंबिके याच्यावर महाराष्ट्र नरबळी, अमानुष अनिष्ट, अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वालचंदनगर जवळील औरंगाबाद डिस्टिलरी कंपनीमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाची ३१ वर्षांची महिला अधिकारी शासनाच्या कामासाठी कार्यरत आहे. १० जुलै ते ५ ऑगस्ट २०२५ दरम्यान अंबिके हा महिलेच्या पिण्याच्या पाण्याच्या बाटलीमध्ये राखेसारखा पांढरा अंगारा टाकत होता. तसेच कार्यालयातील टेबल, खुर्चीवर ही राखेचा अंगारा टाकून जादूटोणा करीत होता.

संबंधित महिलेवर जादूटोणा व वशीकरण करून संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला. संबंधित महिला कार्यालयाच्या बाहेर गेल्यानंतर अंबिके राखेसारखा अंगारा पाण्याच्या बाटलीमध्ये मिसळत होता. संबंधित महिलेला संशय आल्यानंतर तिने कार्यालयाच्या बाहेर जाण्यापूर्वी मोबाइलचे व्हिडिओ रेकॉर्डिंग सुरू ठेवल्यामुळे जादूटोणाच प्रकार उघडकीस आला. दरम्यान, याप्रकरणी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी प्रशांत अंबिके याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास वालचंदनगर पोलीस करीत आहेत.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील २९ गुंड तडीपार

**पुणे, ता. २७ :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त सोमय मुंढे यांनी बाणेर, चतुःशृंगी, येरवडा, चंदननगर, खराडी, वाघोली, लोणीकंद या परिसरातील २६ सराईतांना तडीपार केले आहे. तसेच परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी कात्रज भागातील ३ गुंडांना तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत.

परिमंडळ चारमधून तडीपार झालेल्यांमध्ये शिवाजी लक्ष्मण रामावत (वय ३०, रा. लमाणतांडा, पाषाण), सचिन अशोक रणपिसे (वय २०, रा. लक्ष्मीनगर, येरवडा), सुरज उर्फ किल्या कैलास बाणेकर (वय ३५, रा. येरवडा), मोहम्मद उर्फ रहिम रहेमान शेख (वय १९, रा. येरवडा), सलमान चाँदबाशा शेख (वय ३०, रा. वाघोली), महेश बलभिम सरोदे (वय २२, रा. येरवडा), सुंदर उर्फ कुबड्या राजाराम मेत्रोळ (वय ३५, रा. पर्णकुटी, येरवडा), नंदकुमार संजय पासंगे (वय २२, रा. कामराजनगर, येरवडा), आशा सिताराम राठोड (वय ४८, रा. येरवडा), शांताबाई गोविंद राठोड (वय ५०, रा. नाईकनगर, येरवडा), नीता सुनील नगरकर (वय ६३, रा. वडगावशेरी), गणेश प्रकाश जाधव (वय १९, रा. बाणेर), प्रेम विकी ससाणे (वय १९, रा. येरवडा), मानकीबाई कमलेश चव्हाण (वय ५०, रा. येरवडा), सोनीबाई बासू राठोड (वय ६०, रा. येरवडा), मुन्नीबाई रेड्डी राठोड (वय ५०, रा. नाईकनगर, येरवडा), अंबु राजू धोत्रे (वय ४९, रा. गोखलेनगर), गणेश उत्तम वाघमारे (वय २२, रा. चंदननगर), निलेश राहूल वाघमारे (वय २५, रा. थिटे वस्ती, खराडी), सत्यम राजू चमरे (वय २४, रा. पेरणे, हवेली), मोहम्मद हुसेन खान (वय २२, रा. गाडीतळ, येरवडा), गोपाळ संजय यादव (वय २६, रा. बकोरी रोड, वाघोली), शशि पांडू चव्हाण (वय ४२, रा. नाईकनगर, येरवडा), मोहन बागीवान जाधव (वय ४१, रा. जनवाडी, गोखलेनगर), हबीब इबालु इराणी (वय २३, रा. इराणीवस्ती, शिवाजीनगर), कमल सुभाष चव्हाण (वय ३६, रा. नाईकनगर, येरवडा) यांचा समावेश आहे.

दरम्यान, परिमंडळ चारच्या हद्दीत एकूण १०० हून अधिक सराईत गुन्हेगारांवर पोलिसांची बारीक नजर आहे. त्यांच्याविरुद्धही लवकरच प्रतिबंधक कारवाई होणार असल्याचे सांगण्यात आले. तडीपार केलेले आरोपी पुन्हा शहरात परतल्यास त्वरित जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती देण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

याशिवाय कात्रज भागातील तीन सराईतांना तडीपार करण्यात आले आहे. अभय उर्फ सोन्या अशोक निसर्गंध (वय २०, रा. सिद्धीविनायक कॉलनी, आंबेगाव खुर्द), विनोद दिलीप धरतीमगर (वय २२, रा. आंबेगाव बुद्रुक) आणि प्रथमेश उर्फ अभय देविदास कुडले (वय २१, रा. दत्तनगर, आंबेगाव बुद्रुक) अशी तडीपार झालेल्यांची नावे आहेत. या तिघांना पुणे शहर आणि जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. तिघांना तडीपार करण्याचा प्रस्ताव आंबेगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांनी सादर केला होता.




# दारूच्या वादातून वेटरचा मालकावर हल्ला

## सूचना दिल्याचा राग, चाकूने सपासप वार

**पुणे, ता. २७ :** ''दारु पिऊन कामावर येऊ नको'' अशी ताकीद दिल्याच्या रागातून वेटरने चाकूने वार करून हॉटेल मालकाचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. हा प्रकार बुधवारी रात्री एनडीए रस्त्यावरील पिकॉक गार्डन ॲन्ड रेस्टॅारंटमध्ये घडला.

या प्रकरणात खून झालेल्या हॉटेल मालकाचे नाव संतोष सुंदर शेट्टी (वय ४५) असे आहे. तर आरोपीचे नाव उमेश दिलीप गिरी (वय ३९, रा. पिकॉक गार्डन स्टाफ क्वॉर्टर) असून उत्तमनगर पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

उत्तमनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन खांदारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष शेट्टी यांच्या हॉटेलमध्ये उमेश गिरी हा वेटर म्हणून काम करत होता. तो गेल्या २२ दिवसांपासून कामावर होता आणि कामगारांच्या क्वॉर्टर्समध्ये राहत होता. मात्र, दारु पिऊन कामावर आल्याने शेट्टी यांनी त्याला जाब विचारला. “दारु प्यायची असेल तर कामावर यायचे नाही,” असे सांगून त्यांनी ताकीद दिली होती.

या कारणावरून शेट्टी आणि गिरी यांच्यात वाद झाला. गिरीने “माझा पगार द्या, मी कामावर येत नाही,” अशी मागणी केली. त्यावर शेट्टी यांनी सांगितले की, तुला कामाला लागून २२ दिवस झाले असून त्यात तू आधीच अडीच हजार रुपये घेतले आहेत, अशा परिस्थितीत पगार कसा द्यायचा? यामुळे गिरी अधिक चिडला. यानंतर बुधवारी रात्री शेट्टी हे भटारखान्यात आल्यावर गिरीने तेथील मोठा चाकू उचलून त्यांच्या मानेवर वार केले. या हल्ल्यात शेट्टी गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले; मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी उत्तमनगर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपी उमेश गिरी याला अटक केली आहे.

# रविचंद्रन अश्विनचा मोठा निर्णय!

## अचानक आयपीएलमधून जाहीर केली निवृत्ती



**पुणे, ता. २७ :** गेल्या काही दिवसांपासून रविचंद्रन अश्विनच्या आयपीएल निवृत्तीबद्दल वादविवाद सुरू होते. अखेर आज अश्विनने निवृत्तीची घोषणा करून सर्व अटकळांना आणि चर्चांना पूर्णविराम दिला आहे. अश्विनने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत निवृत्तीची घोषणा केली आहे.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटला निरोप दिल्यानंतर, अश्विन आयपीएलचा भाग होता पण आता त्याने न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने आयपीएलमध्ये एक वेगळे योगदान दिले आहे. अश्विनने आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, ''हा एक खास दिवस आहे आणि म्हणूनच एक खास सुरुवात आहे. असे म्हटले जाते की, प्रत्येक शेवटीएक नवीन सुरुवात होते. आज आयपीएल क्रिकेटर म्हणून माझा प्रवास संपत आहे. परंतु आजपासून एक नवीन प्रवास सुरू होत आहे. मला इतकी वर्षे चांगल्या आठवणी आणि संबंध दिल्याबद्दल सर्व फ्रँचायझींचे आभार. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मला आतापर्यंत जे काही दिले, त्याबद्दल आयपीएल आणि बीसीसीआयचेही आभार. मी भविष्याचा आनंद घेण्यासाठी आणि त्याचा पुरेपूर उपयोग करण्यासाठी उत्सुक आहे.''

अश्विनने २००९ मध्ये आयपीएलचा प्रवास सुरू केला, जो २०२५ पर्यंत चालला. तो या वर्षी शेवटचा चेन्नई सुपर किंग्जकडून खेळला. या मेगा लीगमधील त्याची कारकीर्द बरीच चांगली राहिली आहे. आयपीएलमध्ये अश्विनने एकूण २२१ सामने खेळले आणि १८७ विकेट्स घेतल्या. यादरम्यान त्याचा इकॉनॉमी रेट ७ पेक्षा थोडा जास्त होता. फलंदाजीतील एका अर्धशतकाच्या मदतीने त्याने एकूण ८३३ धावा केल्या. अश्विन आयपीएलमध्ये जवळ-जवळ सर्व संघांसाठी खेळला आहे. चेन्नई सुपर किंग्ज, रायझिंग पुणे सुपरजायंट्स, पंजाब किंग्ज, दिल्ली कॅपिटल्स, राजस्थान रॉयल्स इत्यादी संघांसाठी खेळला आहे. त्याने आपल्या सर्वोत्कृष्ट गोलंदाजीने आयपीएलमध्ये एक वेगळी छाप सोडली होती.

# हरेश पाचुंदकर यांनी १० तासांत चारही द्वारयात्रा पूर्ण केल्या



**रांजणगाव :** अष्टविनायकांपैकी एक श्री क्षेत्र रांजणगाव गणपतीच्या भाद्रपद गणेशोत्सवानिमित्त रांजणगावचे हरेश बाळासाहेब पाचुंदकर (वय ४०) यांनी अभूतपूर्व कामगिरी केली. त्यांनी तब्बल ६१.६ किमी अंतर फक्त १० तास ३० मिनिटांत पार करून एकाच दिवशी चारही द्वारयात्रा पूर्ण केल्या.

‘एक गाव, एक गणपती’ या परंपरेनुसार ग्रामस्थ पायी चार बहिणींच्या मंदिरांना भेट देतातः पूर्वद्वार – दोनलाई देवी, दक्षिणद्वार – शिरसाई देवी, पश्चिमद्वार – ओझराई देवी, उत्तरद्वार – मुक्ताई देवी.

हरेश यांनी मध्यरात्री प्रवास सुरू केला आणि ८ तास ३० मिनिटे सलग पायी चालून उर्वरित वेळ दर्शन व जलाभिषेकासाठी दिली. सकाळी १० वाजता ते रांजणगाव गणपती मंदिरात परतले.

गावकऱ्यांनी त्यांचे स्वागत केले, तर ट्रस्टकडून विशेष सत्कार करण्यात आला. या प्रेरणादायी कामगिरीमुळे परंपरेला आधुनिक काळात नवी दिशा मिळाल्याचे भक्त म्हणतात.

# उरुळी कांचन येथे स्वतंत्र अग्निशमन केंद्रास मंजूरी

**पान १ वरून**

यासाठी स्वतःची अग्निशमन यंत्रणा असणे आवश्यक होती. बऱ्याचदा लागलेली आग आटोक्यात आणण्यासाठी वाघोली व हडपसर पालिकेचा बंब बोलवावा लागत होता. बंब येईपर्यंत संबंधित दुकानदार मालकांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोर जावे लागत होते. त्यामुळे वेळ अधिक लागत असल्याने आगीसारख्या घटना अटोक्यात आणणे जिकिरीचे होते.

दरम्यान, पुणे -सोलापूर महामार्गावरील कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, थेऊर, कुंजीरवाडी, सोरतापवाडी, उरुळी कांचन या भागात झालेल्या औद्योगिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत आहे. शहराचा झपाट्याने विकास होत आहे. या ठिकाणी मोठमोठ्या कंपन्या, शैक्षणिक संकुले, बाजारपेठा व अनेक प्रकारचे व्यवसाय वृद्धिंगत होत आहेत. त्यामुळे नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी संतोष कांचन यांच्याकडे शॉर्टसर्किट व अन्य कारणांनी दुकानांना आगी लागल्याच्या घटना घडल्याची माहिती दिली होती. म्हणूनच अग्निशमन बंबाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी शहरातील नागरिक, व्यापारी यांच्यातून संतोष कांचन यांच्याकडे केली होती. त्यांच्या मागणीला यश आले असून लवकरच या ठिकाणी स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारण्यात येणार आहे.

याबाबत बोलताना यशवंत कारखान्याचे संचालक संतोष कांचन म्हणाले, ''उरुळी कांचन येथेअग्निशमन केंद्रासाठी मागील अनेक दिवसांपासून पाठपुरावा मागील अनेक दिवसांपासून सुरु ठेवला होता. सदरील अग्निशमन केंद्राच्या उभारणीमुळे उरुळी कांचन, दौंड, व पुरंदर तालुक्यातील परिसरातील दुर्घटनांवर तातडीने आळा बसविण्यासाठी मदत होणार आहे. पीएमआरडीएद्वारे उभारण्यात येणारे अग्निशमन केंद्र सर्व सोयींनी सुसज्ज असल्याने भविष्यात या केंद्राचा नागरिकांना चांगल्या प्रकारे फायदा होणार आहे.''

# रील बनवा अन् एक लाख मिळावा

## राज्य शासनाकडून गणेशोत्सवानिमित्त खास स्पर्धेची घोषणा!

**पुणे, ता. २७ :** गणरायाचे आगमन झाले असून, राज्यात आनंदाचे वातावरण आहे. याचदरम्यान, राज्यसरकारकडून एक उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमाअंतर्गत राज्य सरकारकडून एक लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग, तसेच महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्यावतीने गणेशोत्सव विषयक रील स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. यात सहभागी होऊन एक लाख जिंकण्याची संधी आहे.

यासंबंधित सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी ट्विट करत माहिती दिली आहे. ट्विटमध्ये त्यांनी लिहिले आहे की, गणेशोत्सव विषयक रील स्पर्धा २०२५ महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग, तसेच महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्यावतीने गणेशोत्सव विषयक रील स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सहभागी व्हा आणि आपल्या कलाकृतीतून गणेशोत्सवाचा संदेश सर्वत्र पोहोचवा!

तसेच या स्पर्धेसाठी नावनोंदणी कालावधी २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर २०२५ दरम्यान असणार आहे. या स्पर्धेसाठी ऑनलाईन अर्जाद्वारे नावनोंदणी अनिवार्य आहे.

या स्पर्धेसंबंधित अधिक माहिती हवी असेल तर जनसंपर्क विभाग, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व) ९१ ९७०२२७०८२१ येथे संपर्क साधावा.

### स्पर्धेसंबंधित अधिक माहिती

१. स्पर्धेची नोंदणी ऑनलाईन अर्जाद्वारे करावी.

२. स्पर्धकांनी घरगुती किंवा सार्वजनिक ठिकाणांच्या गणेशोत्सवाच्या रील तयार करणे आवश्यक राहील.

३. स्पर्धेचा कालावधी दिनांक २६ ऑगस्ट ते ०७ सप्टेंबर २०२५ असा आहे.

४. स्पर्धकांनी गणेशोत्सवामध्ये, पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर यांच्यापैकी कोणतीही एक थीम मध्यवर्ती ठेवून किमान ३० सेकंद ते कमाल ६० सेकंदापर्यंत रील तयार करावी.

५. रील शूट करताना, कोणत्याही सार्वजनिक मंडळाचे, सार्वजनिक ठिकाणाचे चित्रीकरण करणार असाल तर संबंधित मंडळाची परवानगी घेणे आवश्यक आहे, मंडळांनी आपल्या रील वर आक्षेप घेतल्यास सदर स्पर्धकाला बाद करण्यात येईल.

६. रील RATI० १६.९ म्हणजेच उभा (व्हर्टिकल) असावा.

७. स्पर्धकांनी स्वतःच्या INSTAGRAM व FACEBOOK हॅन्डल्सवर रील्स पोस्ट करणे बंधनकारक राहील. रिल पोस्ट करताना फिल्मसिटी मुंबईच्या ऑफिशियल INSTAGRAM आणि FACEBOOK हॅण्डलला COLLAB करणे बंधनकारक आहे.

८. स्पर्धकांनी कोणत्या विषयाला अनुसरून रील तयार केली आहे याचं थोडक्यात वर्णन करावं.

९. अर्जामध्ये फेसबुक आणि इंस्टाग्राम माध्यमातून अपलोड केलेल्या रीलची लिंक योग्य पद्धतीने भरावी.

१०. रील तयार करताना सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक सलोखा बिघडणार नाही याची काळजी घ्यावी.

११. रिल्सवर कृत्रिम पध्दतीने लाईक, व्ह्यूज वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आल्यास स्पर्धकास बाद ठरविण्यात येईल.

१२. महाराष्ट्रातील स्पर्धकांनी आपली नाव नोंदणी आपापल्या महसूल विभागातून करावी.

१३. विभागीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी, आपण ज्या ठिकाणी चित्रीकरण करणार आहात, किंवा ज्या ठिकाणावरील गणपती बाप्पा रीलमध्ये दिसेल त्या विभागातून आपली नोंदणी करावी लागेल. (म्हणजे आपण पुण्यात राहत असाल, आणि रील रत्नागिरीतील गणपती बाप्पाची असेल तर आपला विभाग रत्नागिरी म्हणजेच कोकण महसूल विभाग ग्राह्य धरला जाईल.)

१४. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी वेगळी नोंदणी करण्याची आवश्यकता नाही, विभागीय पातळीवरील स्पर्धकांमधूनच राज्यस्तरीय विजेत्यांची घोषणा केली जाईल.

१५. तिन्ही गटांसाठी एकच नोंदणी अर्ज असून त्यात एका स्पर्धकाने एकदाच नोंदणी करावी.

१६. नोंदणी अर्जामध्ये आपल्या राज्याचा / देशाचा योग्य उल्लेख करावा.

१७. गणपती बाप्पा चे स्थळ समजावे याकरिता चित्रीकरणादरम्यान गुगल टॅग फोटो अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे

१८. अर्ज भरण्यापूर्वी, स्पर्धेचे नियम व अटी आणि शपथपत्र काळजीपूर्वक वाचावे.

१९. परिक्षकांनी दिलेला निकाल अंतिम असेल.

२०. स्पर्धेत कोणत्याही टप्प्यावर बदल अथवा स्पर्धा रद्द करण्याचा सर्वाधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

### बक्षीस

१. प्रथम पारितोषिक - रूपये १ लाख
२. द्वितीय पारितोषिक - रूपये ७५ हजार
३. तृतीय पारितोषिक - रूपये ५० हजार
४. उत्तेजनार्थ पारितोषिक - रूपये २५ हजार

**महाराष्ट्राबाहेर व भारताबाहेरील (खुला गट)**

१. प्रथम पारितोषिक - रूपये १ लाख
२. द्वितीय पारितोषिक - रूपये ७५ हजार
३. तृतीय पारितोषिक - रूपये ५० हजार
४. उत्तेजनार्थ पारितोषिक - रूपये २५ हजार

**स्पर्धकांनी ‘या’ गोष्टी टाळाव्यात**

१. सार्वजनिक मंडळाची परवानगी न घेता चित्रीकरण करू नये.

२. रील मध्ये अश्लील, धार्मिक भावना दुखावणारे, वादग्रस्त मजकूर/दृश्य ठेवू नये.

३. ६० सेकंदांपेक्षा जास्त किंवा ३० सेकंदांपेक्षा कमी कालावधीची रील तयार करू नये.

४. HORIZONTAL (आडवे) व्हिडिओ शूट करू नये; फक्त VERTICAL (उभा) स्वरूप मान्य आहे.

५. रील अपलोड करताना FILMCITY MUMBAI हॅंडलला COLLAB न केल्यास सहभाग ग्राह्य धरला जाणार नाही.

६. इतरांचा कॉपीराइट असलेला व्हिडिओ, फोटो विनापरवानगी वापरू नये.

७. रील पोस्ट केल्यानंतर विहित नमुन्यात आणि कालमर्यादित स्पर्धा अर्ज भरला गेला नाही तर स्पर्धेतील सहभाग अमान्य ठरेल.

८. स्पर्धकांने खोटी माहिती, चुकीची लोकेशन किंवा बनावट परवानगी दाखवू नये.